# INDEX

ROYAL ARCADE BESA NAGPUR PLOT NO. 6, 7, 8, MANOHAR SOSS.

NAME: ______ STD.: ______ SEC.: ______ ROLL NO.: ______ SUB.: ______

| S. No. | Date / Flat No | Title / Name of flat Owners | Page No. / Mobile No. | Teacher's Sign / Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | 101 | Mr. Rajesh M. Likhitkar | 9970252647 | |
| 2. | 102 | Ku. Pragati S. Ganvir | 8407943305 | |
| 3. | 103 | Mr. Laxman A. Kanode | 8329313757 | |
| 4. | 104 | Mr. Vishal A. Kankale | 8149796030 | |
| 5. | 201 | Mr. Manish S. Pande | 9764665737 | |
| 6 | 202 | Mr. Rajesh R. Adyalkar | 7020896432 | |
| 7. | 203 | Mr. Yogesh R. Khirale | 7588779160 | |
| 8. | 204 | Mr. Niranjan B. Khapekar | 9890242187 | |
| 9. | 301 | Mr. Pradeep V. Bakshi | 9822945719 | |
| 10. | 302 | Mr. Bhanu G. Rairkar | 9422369352 | |
| 11. | 303 | Smt. Sheela A. Bhokare | 8830672810 | |
| 12. | 304 | Mr. Ravindra S. Tidke | 9325268791 | |
| 13. | 401 | Mr. Madhusudan S. Muley | 9226870452 | |
| 14. | 402 | Mr. Shrikant P. Desai | 9403393672 | |

| S. No. | Date | Title | Page No. | Teacher's Sign / Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | | PLUMBER : Mithun - 9049139775 | | |
| 2. | | ELECTRICIAN : Nanaji - 9665426551<br>(Rambas Sarode) 9422115217 | | |
| 3. | | CARPENTER : Bawane - 8796781615 | | |
| 4. | | LIFT KONE COMPLAINT :-<br>Sushant - 7798115666 | | |
| 5. | | TANK CLEANER : Shri. Suhas Patil<br>9765203988 | | |
| 6. | | MSEB REWATI NAGAR, BESA<br>9145202776 | | |
| 7. | | POLICE STATION, BELTARODI, NAGPUR<br>07103297617 | | |

# सूचना

रॉयल आर्केड या इमारतीत राहणाऱ्या सर्व सदनिकाधारकांना, किरायेदारांना सूचित करण्यात येत आहे की, रॉयल आर्केड ओनर्स कंडोमिनियमची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ३१ जुलै 202 रोजी सकाळी 10.00 वाजता इमारतीतील पार्किंगच्या जागेत आयोजित करण्यात आलेली आहे.

सर्व सदनिकाधारकांनी, किरायेदारांनी सभेस उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

कृते रॉयल आर्केड असोसिएशन
नॅशनल बिल्डर्स अँड डेव्हलपर्स
तर्फे भागीदार

दिनांक 23.07.2022

श्री. कुणाल दिनकरराव निसवाडे

# वार्षिक सर्वसाधारण सभा

## रविवार, दिनांक 31 जुलै 2022

रॉयल ऑर्केड ओनर्स कंडोनियमची वार्षिक सर्वसाधारण सभा आज रविवार दिनांक 31 जुलै 2022 रोजी सकाळी 10.00 वाजता रॉयल ऑर्केड अपार्टमेंटमध्ये पार्किंगच्या जागेवर संपन्न झाली.

सभेला खालीलप्रमाणे सभासद उपस्थित होते.

| अ. क्र. | सभासदाचे नाव | फ्लॅट क्रमांक | सही |
|---|---|---|---|
| 1. | प्रदीप बर्डे | 301 | [signature] |
| 2. | भानू गजानन राइरकर | 302 | [signature] |
| 3. | रविंद्र एस. तिडके | 304 | [signature] |
| 4. | Yogesh G. Turkar | 102 | [signature] |
| 5. | राजेंद्र डॉ. पोंडे | 104 | [signature] |
| 6. | Prashant Kshirsagar | 303 | [signature] |
| 7. | Mrs. Bharti Tidke | 304 | Tidke |
| 8. | Shweta Bakshi | 301 | S. Bakshi |
| 9. | Jaya Rairker | 302 | Jaya |
| 10. | Madhusudan Muley | 401 | [signature] |
| 11. | Yogesh Khirale | 203 | [signature] |
| 12. | Laxman Kanade | 103. | [signature] |



P.T.O.

| अ.क्र | सभासदाचे नाव | फ्लॅट क्र. | सही |
| --- | --- | --- | --- |
| 13. | प्रगती गणवीर | 102 | [signature] |

ROYAL ARCADE
BESA
NAGPUR
PLOT NO. 6, 7, 8, MANOHAR G.N.S.S.

For ROYAL ARCADE

[signature] / [signature]

President / Secretary

classmate Date ___ Page ___

# वार्षिक सर्वसाधारण सभा

रविवार, दिनांक 31 जुलै 2022

रॉयल आर्केड ओनर्स कंडोमिनीयमची वार्षिक सर्वसाधारण सभा आज रविवार दिनांक 31 जुलै 2022 रोजी सकाळी 10.20 वाजता "रॉयल आर्केड" मध्ये पार्किंगच्या जागेवर संपन्न झाली.

सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. प्रदीप विश्वनाथ बक्षी साहेब होते. या सभेत पुढील विषयावर चर्चा झाली व काही निर्णय घेण्यात आले.

विषय क्र. 1 :- वर्ष 2022-2023 ते 2024-2025 या कालावधीकरीता कार्यकारिणीची निवड करणे.

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्वानुमते पुढील कार्यकारिणी अविरोध निवडण्यात आली.

1) अध्यक्ष : श्री. प्रदीप विश्वनाथ बक्षी
2) उपाध्यक्ष : श्री. मधुसूदन साहेबराव मुळे
3) सचिव : श्री. रविंद्र शंकरराव तिडके
4) सहसचिव : श्री. राजेश रामकुमार अड्याळकर
5) कोषाध्यक्ष : श्री. भानु गजानन गाईरकर

सर्वानुमते ही कार्यकारिणी मंजूर करण्यात आली.

विषय क्र. 2 :- राष्ट्रीयकृत बँकेत खाते काढणेबाबत

सोसायटीचे आर्थिक व्यवहार पार पाडण्याकरीता सोसायटीच्या नावे अर्थात 'रॉयल आर्केड' च्या नावे बँक ऑफ बडोदा / स्टेट बँक ऑफ इंडिया, मनिष नगर शाखा, नागपूर येथे खाते उघडण्याबाबत चर्चा करण्यात आली.

बँकेतील बचत खाते अध्यक्ष श्री. प्रदीप वी. बक्षी, उपाध्यक्ष श्री. मधुसूदन सा. मुळे, सचिव श्री. रविंद्र श. तिडके व कोषाध्यक्ष श्री. भानु ग. गाईरकर यांनी संयुक्त परिचलन करण्याकरीता सर्वानुमते सहमती प्रदान करण्यात आली.

अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष या चौघांपैकी कोणत्याही दोघांद्वारे व्यवहार करण्यात येतील अर्थात उपरोक्त चार पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांद्वारे धनादेशावर स्वाक्षरी करण्यात येईल.

विषय क्र. ३ :- विकासक मे. नॅशनल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स ने ठेवलेल्या चौकीदारास पुढे कामावर ठेवणेबाबत.

रॉयल आर्केड या इमारतीमध्ये चौकीदाराचे काम श्री. सितारामजी नागपुरे यांचे कुटुंबीय करतात. त्यांच्या कामामध्ये, काही बाबतीत सुधारणा करण्याची गरज असल्याचे काही सदस्यांनी सूचित केले. त्यांचा टेबल पार्किंगमध्ये ज्या जागेवर ठेवलेला आहे तेथून तो टेबल योग्य अशा ठिकाणी हालविण्याचा निर्णय घेण्यात आला, जेणेकरून त्यांना त्यांच्या जागेवरूनच इमारतीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे लक्ष ठेवता येईल.

वेळोवेळी त्यांच्या कामाचा आढावा घेवून गरजेप्रमाणे योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

विषय क्र. ४ :- इमारतीत राहणाऱ्या सदनिकाधारकांच्या सुरक्षेची अधिक काळजी घेणेबाबत.

वरील विषयावर सविस्तर चर्चा करून असा निर्णय घेण्यात आला की, इमारतीमध्ये प्रवेश करणाऱ्या बाहेरील प्रत्येक व्यक्तीचे नाव व मोबाईल क्रमांक रजिस्टरमध्ये नोंद करून ठेवण्यात यावा. नोंद केल्याशिवाय चौकीदार कोणत्याही बाहेरील व्यक्तीला कोणत्याही माळ्यावर जायची परवानगी देणार नाही.

सुरक्षेच्या दृष्टीने सदनिकाधारकांनी मुख्यद्वार उघडण्यापूर्वी दाराला असलेली खिडकी उघडून बाहेरून आलेली व्यक्ती कोण आहे, हे पाहूनच योग्य तो निर्णय घ्यावा. घरी लहान मुले असल्यास शक्यतोवर त्यांना सुरक्षेविषयी, दार उघडण्याविषयी आवश्यक त्या सूचना देऊन ठेवाव्यात.

विषय क्र. ५ :- इमारतीतील स्वच्छतेबाबत.

या इमारतीतील पायऱ्या व कॉमन पॅसेज आठवड्यातून दोनदा स्वच्छ करण्यात यावा, झाडू-पोछा करण्यात यावा. पार्किंगची जागा आठवड्यातून एकदा स्वच्छ करण्यात यावी. या करीता पार्किंगमधील गाड्या हलविण्याची गरज असल्यास

सदनिकाधारकांनी चौकीदारास आवश्यक ते सहकार्य करावे.

विषय क्र. 6 :- लिफ्टमध्ये जड सामान, फर्निचर इत्यादी सामग्री घेऊन न जाणेबाबत.

वरील विषयावर सविस्तर चर्चा करून असा निर्णय घेण्यात आला की, लिफ्टमध्ये कुणीही, कधीही असे कोणतेही सामान घेऊन जाऊ नये ज्यामुळे लिफ्टचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होईल. या बाबतीत चौकीदाराने काही सूचना दिल्यास त्यांचे पालन करण्यात यावे, त्याच्याशी कुणीही वाद घालु नये कारण तो त्याला दिलेल्या लिफ्टच्या वापराविषयींच्या सूचनांचे पालन करतो.

विषय क्र. 7 :- सदनिकाधारकांना त्यांची सदनिका किरायाने द्यायची असल्यास घ्यावयाच्या काळजीबाबत.

वरील विषयावर सविस्तर चर्चा करून असा निर्णय घेण्यात आला की, कोणत्याही सदनिकाधारकास, स्वतःची सदनिका किरायाने द्यायची असल्यास येणाऱ्या किरायेदाराविषयी सविस्तर माहिती घेऊनच त्यांना ती देण्यात यावी. त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड घेण्यात यावे, त्यांच्याशी करार करण्यात यावा व करारनाम्याची एक प्रत सोसायटी / विकासक यांना देण्यात यावी.

येणाऱ्या किरायेदारास सोसायटीच्या नियमावलींची संपूर्ण माहिती सदनिकाधारकाने किरायेदार राहायला येण्यापूर्वीच द्यावी, जेणेकरून लिफ्ट, पार्किंग व कॉमन पॅसेज यांच्या वापराविषयी किरायेदारास कुठलीही शंका राहणार नाही.

विषय क्र. 8 :- इमारतीमध्ये येणाऱ्या बाहेरील व्यक्तींच्या गाड्यांच्या पार्किंगबाबत (विझीटर्स पार्किंगबाबत)

वरील विषयावर चर्चा करून सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की, इमारतीमध्ये येणाऱ्या बाहेरील व्यक्तींनी त्यांची वाहने इमारतीच्या कम्पाऊंड वॉलच्या बाहेर रोडवर उपलब्ध असलेल्या जागेत योग्य अशा ठिकाणी लावावीत, जेणेकरून रस्त्यावरील वाहतूकीस कुठलाच अडथळा निर्माण होणार नाही. कुठल्याच

परिस्थितीत बाहेरील व्यक्तींनी त्यांची वाहने इमारतीच्या आतील जागेत लावू नये.

विषय क्र. 9 :- सोसायटीमध्ये शिस्त पाळणेबाबत, सुरक्षेची काळजी घेण्याबाबत, स्वच्छता व सौंदर्य राखण्याबाबत.

वरील विषयावर सविस्तर चर्चा करून सर्वानुमते असे निर्णय घेण्यात आलेत, ते पुढीलप्रमाणे आहेत.

1) विकासकाने सदनिकाधारकांना अलॉट / वितरण केलेल्या जागेवरच सदनिकाधारकांनी आपली वाहने ठेवावीत. इमारतीच्या उत्तरेकडील दोन्ही फाटक सध्या बंद असल्यामुळे इमारतीतील वरील सदनिकाधारकांना त्यांचे वाहन पार्क करण्यात काही अडचण येत असल्यास त्यांची वाहने त्यांना इमारतीत इतरत्र उपलब्ध असलेल्या जागेवर ठेवता येईल. परंतु यामुळे इतर लोकांना त्यांची वाहने काढतांना किंवा ठेवतांना कुठलीच अडचण होणार नाही याची काळजी घ्यावी. उत्तरेकडील दोन्ही फाटकांचा भविष्यात वापर सुरु झाल्यास कुणालाच त्यांची वाहने ठेवण्यास अडचण भासणार नाही.

2) संध्याकाळी 6 वाजता नंतर कोणत्याही बाहेरच्या व्यक्तीला कुठलेही काम करण्याकरीता इमारतीच्या छतावर, टेरेसवर जाण्याची परवानगी राहणार नाही. संध्याकाळी 6 वाजता नंतर कुठल्याही कामाचे "प्राधान्य" असल्यास अशा बाहेरील व्यक्तीसोबत सदनिकाधारकाने स्वतः जावेत.

3) इमारतीत असणाऱ्या पाण्याच्या सर्व टाक्या आर्थिक वर्षातून दोन-तीन वेळा गरजेप्रमाणे स्वच्छ करण्यात याव्यात. या टाक्या प्रोफेशनल टॅन्क क्लीनर कडूनच स्वच्छ करण्यात याव्यात.

4) लेआऊट मध्ये असलेल्या खुल्या जागेवर प्लान्टेशन व ग्रीन झोन तयार करण्याकरीता पाठपुरावा करण्यात यावा.

5) इमारतीच्या आतमधील काही ठिकाणी मोकळ्या जागेत झाडे लावण्यात यावीत. काही ठीकाणी कुंड्या ठेवण्यात याव्यात. या कामाकरीता गरज पडल्यास तज्ञ गार्डनर ची / माळ्याची मदत घेण्यात यावी.

classmate

विषय क्र. १० :- विकासक मे. नॅशनल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांना काही बाबींची पूर्तता करण्यास विनंती करणेबाबत

वरील विषयावर चर्चा करून सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की, मे. नॅशनल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांना खालील बाबींची पूर्तता करण्यास विनंती करण्यात यावी.

1) पार्किंगच्या जागेमध्ये दोन चाकी व चार चाकी वाहने ठेवण्याकरीता योग्य अशी मार्किंग करून देण्यात यावी.

2) स्टेअरकेस व त्या मागची भींत पावसामुळे काही ठिकाणी खराब झालेली आहे. त्यामुळे आवश्यक त्या ठिकाणी पेंटींग करून देण्यात यावी

3) टेरेसवर असलेल्या लोखंडी दाराच्या गॅपमधून टेरेसवरील पाणी वाहून पायऱ्यांवर येत आहे, ते बंद करण्यात यावेत.

4) टेरेसवर काही ठिकाणी रिपेयर व पेंटींगची आवश्यकता आहे ती योग्य वेळी करून देण्यात यावी.

5) इमारतीतील पार्किंगच्या जागेत बाहेरून येणाऱ्या व्यक्तींसाठी, कामवाल्यांसाठी, जो टॉयलेट तयार केलेला आहे त्यावर छत टाकून देण्यात यावे.

वरील कामांची पूर्तता करण्यास विकासकांना पुरेसा वेळ देण्यात यावा.

आभार प्रदर्शनानंतर ही सभा समाप्त झाली.

ROYAL ARCADE BESA NAGPUR PLOT NO. 6, 7, 8, MANOHAR G.N.S.S.

For ROYAL ARCADE

President / Secretary